# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (सप्टेंबर १९७३, वर्ष ४६वे, अंक ९, क्रमांक ५४९)

यां अंकात संपादकीय व नऊ लेख आहेत.

शास्त्रीय लेख मध्ये श्री. श्री. ग. बेडेकरांनी शास्त्रीय लेखन कसे असावे याविषयीच्या कल्पना स्पष्ट केल्या आहेत. अभिनव वेदनाशामक तंत्र या लेखात श्री. मो. ना. गोखले यांनी वेदना कशा निर्माण होतात यासंबंधीचे मूलभूत शरीर विज्ञान कसे अभ्यासले याची माहिती दिली आहे. प्रा. शंकर लक्ष्मण चोरघडे यांनी कै. अर्देशीर करसेटजी वाडिया यांच्या विषयी लेख लिहिला आहे. कै. अर्देशीर यांना फेलो ऑफ दि रॉयल सोसायटी होण्याचा बहुमान मिळाला. वाफेवर चालणारी जहाजे, छोटी मोठी उपकरणे ही त्यांनी निर्माण केली. प्राणीजगतातील नातीगोती हा लेख डॉ. अनिल लाटे यांनी प्रामुख्याने प्राण्यांची वर्गवारी कशी करावयाची या विषयासंबंधी लिहिला आहे. त्यांनी उदाहरण म्हणून गांडूळ, सरडा बैल व मनुष्य यांचे वैशिष्ट्यांवरून वर्गीकरणाची पद्धत सांगितली आहे. काळाच्या उदरात: हा लेख श्री. प्र. के. घाणेकर यांनी लिहिला आहे. पृथ्वीची उत्पत्ती आणि नंतर जीवसृष्टी कशी निर्माण झाली याबद्दलचे सिद्धांत आहेत, पण श्री. टायलर श्री. बारधुर्न यांनी अनेक सूक्ष्मजीव कित्येक अब्ज वर्षांपूर्वीच निर्माण झाले हे शोधून काढले. त्याविषयी सांगितले आहे. श्री. श्या. ग. कुलकर्णी यांनी एक वैशिष्ट्यपूर्ण ओतनपद्धती या लेखात, लाकूड आणि वाळू नंतर मेणाचा साचा – लॉस्ट वॅक्स मेथड व त्यानंतर धातूचा साचा बनवून युरिया सारखा पदार्थ वापरून  अचूक मोजमापाचे साचे करणे शक्य झाले आहे, ते सांगितले. श्री. अरुण कदम यांनी स्मरणशक्ती रासायनिक पदार्थ आहे काय? ह्या लेखात एखादी गोष्ट स्मरणात ठेवतात म्हणजे नक्की काय याविषयीचे संशोधन डॉ. जॉर्जेस डांगर व डॉक्टर बर्झुडस्की यांनी केले त्याविषयी सांगितले आहे. त्यांनी उंदरावर संशोधन करून असे निष्कर्ष काढले की स्मरणशक्ती म्हणजे एक विशिष्ट पदार्थाच्या निर्मितीची जीवरासायनिक क्रिया होय. प्र. मा. अ. राईलकर यांनी त्यांच्या विभाज्यतेची कसोटी या लेखात कुठल्या संख्यांना १३ व १९ ने भाग जाईल याविषयीच्या कांहीं पद्धती समजावून सांगितल्या आहेत. डॉ. वा. द. वर्तक यांनी कै. डॉ. आघारकर–वनस्पती शास्त्रज्ञ–यांनी कोकण किनार पट्टीवर आढळणाऱ्या स्पंज वर्गातील प्राण्यांच्या  नवीन जाती शोधल्या. वाळवंटात सापडणाऱ्या वनस्पतीवर संशोधन करून पी. एच. डी प्राप्त केली. पुण्यात येऊन, त्यांनी महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिवेशन ऑफ दि सायन्स ही संस्था स्थापन केली. मानाचा मुजरा या श्री. प्रभाकर सोवनी यांच्या लेखामध्ये चार जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांचा परिचय करून दिला आहे. (१) मायकेल फॅरेडे– मायकेल फॅरेडे यांचे मुख्य संशोधन प्रवाही विद्युत रसायन आणि धातू रसायन या संबंधी आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ विद्युतधारणेच्या एककाला फॅरेडे असे नाव देण्यात आले. (२) जॉन डाल्टन– डाल्टन यांचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. त्यांचा सिद्धांत म्हणजे प्रत्येक मूलद्रव्य हे अत्यंत सूक्ष्म कणाने बनलेले असते आणि हा सुक्ष्मकण–अणु–हा कधीही न फोडता येणारा अभेद्य व अच्छेद्य अणु असतो. (३) आयव्हॅन पॅव्हलॉव्ह – यांचा रशियात जन्म झाला. १८७९मध्ये त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. तिथे त्यांनी चेतनव्युह (नर्व्हस सिस्टीम)आणि पचनक्रिया यांचा परस्पर संबंध यावर मौलिक संशोधन केले त्याबद्दल त्यांना १९०४ चे नोबेल पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांनी प्रतिक्षिप्त प्रक्रिया बद्दल मूलभूत संशोधन केले. कुत्र्यावर प्रयोग करून अन्न खाताना घंटा वाजवण्यामुळे क्रियेमुळे पाचक रस निर्माण होतात हे दाखवून दिले. (४) एनरिको फेर्मी– यांचा जन्म इटलीतील. जर्मन  विद्यापीठात  अणुकणां विषयी संशोधन केले. त्यांना १९३८ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले २ डिसें. १९४२ रोजी त्यांनी पहिला यशस्वी अणुस्फोट घडवून आणला.

◆

**अशोक तातुगडे**
मो. – ७०५७५४५७६९